RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १४१] सोमवार, नोव्हेंबर २, २०२६/कार्तिक ११, शके १९४८ [पृष्ठे ३६, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ४५३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२६.

अधिसूचना

वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९.

क्रमांक वैमाशा-२०२६/प्र.क्र.३९/गा.सं-३.— वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा क्रमांक १) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) व २ मधील खंड (ग) सह कलम २३(२) च्या पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंबंधात महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून उक्त अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाशी पूर्वविचारविनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये महाराष्ट्र शासन खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करीत आहे. सर्व संबंधितांना माहितीसाठी व त्यांच्याकडून काही हरकती व सूचना असल्यास त्या विचारात घेवून सदरचा प्रारूप मसुदा दि.१९/११/२०२६ रोजी किंवा तद्नंतर विचारात घेण्यासाठी कलम ५३ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन प्रसिद्ध करीत आहे.

२. उपरोक्त मसुदयासंदर्भात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती व सूचना, अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२ यांना प्राप्त होतील, त्या शासन विचारात घेईल.

मसुदा नियम

१. या नियमांना महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) (पहिली सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ (यापुढे ज्याचा "मूळ नियम" म्हणून उल्लेख केला आहे) च्या नियम ६ मध्ये.—

(क) पोट-नियम (१) मध्ये,—

(एक) "परवाना मिळावा" (license) या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र मिळावे" (registration certificate) हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "पद्धतीत" या शब्दानंतर "स्वयंघोषणापत्रासह" (with self-declaration) हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) पहिल्या परंतुकात "दुरूस्तीचा कोणताही परवाना" या शब्दांऐवजी "दुरुस्तीचे नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(चार) दुसऱ्या परंतुकात "केलेला परवाना" या शब्दाऐवजी "केलेले नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ख) पोट-नियम (२) वगळण्यात येत आहेत;

(ग) पोट-नियम (३) मध्ये,—

(एक) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(घ) पोट-नियम (४) ऐवजी, खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात येत आहेत, म्हणजेच:-

"(४) एकदा देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र, ते धारण करणाऱ्या व्यक्तीने कामकाज बंद करण्याचे निश्चित केल्याखेरीज किंवा या नियमांनुसार ते निलंबित अथवा रद्दबातल केले नसल्यास, वैध राहील.";

(ङ) पोट-नियम (५) मध्ये,-

(एक) "पोट-नियम (१) आणि (२)" या शब्दांऐवजी, कंसांऐवजी व अंकाऐवजी "पोट-नियम (१)" हे शब्द, कंस व अंक समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनकरता" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राकरिता" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) परंतुके वगळण्यात येत आहेत;

(च) पोट-नियम (६) ऐवजी, खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात येत आहेत, म्हणजेच:-

"(६) नोंदणीकृत व्यक्ती, अनुसूची ५ मध्ये विहित केलेले आवश्यक शुल्क भरून नोंदणी प्रमाणपत्रात फेरफार करण्यासाठी ऑनलाइन अर्ज करू शकेल.";

(छ) पोट-नियम (८) मध्ये,-

(एक) "लायसनप्राप्त उत्पादक, विक्रेता आणि दुरुस्तक यांची नोंदवही अनुसूची सात मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्रप्राप्त उत्पादक, विक्रेता आणि दुरुस्तक यांची ऑनलाइन नोंदवही नियंत्रकाद्वारे वेळोवेळी विहित केल्यानुसार" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ज) पोट-नियम (९) मध्ये, "लायसनप्राप्त" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्रप्राप्त" हा शब्द समाविष्ट करण्यात येत आहे;

(झ) पोट-नियम (१०) मध्ये, परंतुक वगळण्यात येत आहे;

(ञ) पोट-नियम (११) मध्ये, "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहे;

(ट) पोट-नियम (११) नंतर, समाविष्ट करण्यात येत असलेला पोट-नियम खालीलप्रमाणे असेल-

"(१२) महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) (सुधारणा) नियम, २०२६ लागू होतील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी या नियमांतर्गत वैध लायसन धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, या नियमांतर्गत नोंदणीकृत व्यक्ती असल्याचे आणि तिच्याकडील लायसन, या नियमाखाली निर्गमित नोंदणीप्रमाणपत्र असल्याचे मानण्यात येईल.";

(ठ) समासातील शीर्षकात (marginal heading), "यांना लायसन देण्याबाबत" या शब्दांऐवजी "यांची नोंदणी करणेबाबत" हा शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

३. मूळ नियमांच्या नियम ७ मध्ये.-

(क) पोट-नियम (१) मध्ये, "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ख) पोट-नियम (२) मध्ये, "लायसन" हा शब्द ज्या दोन्ही ठिकाणी येतो, तेथे "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ग) पोट-नियम (४) मध्ये, "लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एका महिन्याच्या आत" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्रात फेरफार करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास तीस दिवसांच्या आत ऑनलाइन" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(घ) पोट-नियम (५) मध्ये,-

(एक) "किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) स्पष्टीकरण १ मध्ये,-

"लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड (क) मध्ये,-

(एक) "लायसनधारकाने" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीने" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड *(ख)* मध्ये,-

(एक) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ङ) समासातील टीपेत (marginal note), "लायसनबाबतच्या" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राबाबतच्या " हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

४. मूळ नियमांच्या नियम ८ मध्ये-

(क) पोट-नियम (१) मध्ये-

(एक) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) खंड (छ) मध्ये,-

उप-खंड *(एक)* मध्ये, "वैध मापनशास्त्र अधिकाऱ्याकडे" या शब्दांनंतर "किंवा शासन मान्यता प्राप्त चाचणी केंद्रात" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

उप-खंड *(दोन)* मध्ये, "वैध मापनशास्त्र अधिकाऱ्याकडे" या शब्दांनंतर "किंवा शासन मान्यता प्राप्त चाचणी केंद्रात" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील;

(ख) पोट-नियम (२) मध्ये, "लायसन" हा शब्द ज्या दोन्ही ठिकाणी येतो, तेथे "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील;

(ग) पोट-नियम (४) मध्ये, "लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एका महिन्याच्या आत" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्रात फेरफार करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास तीस दिवसांच्या आत ऑनलाइन" हे शब्द दाखल करण्यात येतील;

(घ) पोट-नियम (५) मध्ये,-

(एक) "किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) स्पष्टीकरण १ मध्ये-

"लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड *(क)* मध्ये-

(एक) "लायसनधारकाने" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीने" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड *(ख)* मध्ये-

(एक) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) “लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ङ) समासातील टीपेत, "लायसनबाबतच्या" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राबाबतच्या" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

५. मूळ नियमांच्या नियम ९ मध्ये-

(क) पोट-नियम (१) मध्ये, "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ख) पोट-नियम (२) मध्ये, "लायसन" हा शब्द ज्या दोन्ही ठिकाणी येतो, तेथे "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ग) पोट-नियम (३) मध्ये, "लायसन देणाऱ्या प्राधिकाऱ्यास एका महिन्याच्या आत." या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्रात फेरफार करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास तीस दिवसांच्या आत ऑनलाइन." हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(घ) पोट-नियम (४) मध्ये,-

(एक) "किंवा नूतनीकरण करण्यात आलेले लायसन" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) स्पष्टीकरण १ मध्ये,-

"लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड (क) मध्ये,-

(एक) "लायसनधारकाने" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीने" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

खंड (ख) मध्ये,-

(एक) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) “लायसनचा" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचा" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ङ) समासातील टीपेत, "लायसनबाबतच्या" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राबाबतच्या" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

६. मूळ नियमांच्या नियम १० मध्ये,-

(क) पोट-नियम *(१)* मध्ये,-

(एक) "लायसन धारकास अधिनियमान्वये दिलेले, नूतनीकरण केलेले किंवा चालू असलेल्या लायसनबाबत " या शब्दांऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीस अधिनियमान्वये दिलेले किंवा चालू असलेले नोंदणी प्रमाणपत्राबाबत" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसन देण्याबाबत, त्याचे नूतनीकरण करण्याबाबत" या शब्दांऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसनधारकाने" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीने" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(चार) "लायसनधारकाची" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीची" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(पाच) "लायसन" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(सहा) पहिल्या परंतुकात *(अ)* "लायसनधारकास" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीस" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(आ) "लायसन " या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(सात) दुसऱ्या परंतुकात "लायसनचे" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचे" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(ख) पोट-नियम *(२)* मध्ये,-

(एक) "लायसनधारकाने" या शब्दाऐवजी दोन ठिकाणी जेथे हे शब्द येतात तेथे "नोंदणीकृत व्यक्तीने" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनच्या" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राच्या" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(तीन) "लायसन " या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(चार) परंतुकात *(अ)* "लायसनधारकास" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्तीस" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

(आ) "लायसन " या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द दाखल करण्यात समाविष्ट करण्यात येत आहेत.;

(ग) पोट-नियम *(३)* मध्ये,-

(एक) "लायसनचे" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचे" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(दोन) "लायसनधारक " या शब्दाऐवजी दोन ठिकाणी जेथे हे शब्द येतात तेथे "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(घ) पोट-नियम (५) मध्ये, *(अ)* "लायसन" या शब्दाऐवजी जेथे हा शब्द येईल तेथे "नोंदणी प्रमाणपत्र" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(आ) "लायसनधारक" या शब्दाऐवजी "नोंदणीकृत व्यक्ती" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

(च) समासातील टीपेत, "लायसनचे" या शब्दाऐवजी "नोंदणी प्रमाणपत्राचे" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत;

७. मूळ नियमांच्या नियम १३ च्या पोट-नियम (१) मध्ये, "अन्य ठिकाणी" या शब्दांनंतर "किंवा शासन मान्यताप्राप्त चाचणी केंद्रात" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

८. मूळ नियमांच्या नियम २३ मध्ये, "अशा कोणत्याही व्यक्तीस पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाची शिक्षा करण्यात येईल." या शब्दांऐवजी "अशी कोणतीही व्यक्ती एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतका दंड आणि नोंदणी निलंबन, किंवा यथास्थिती, नोंदणी रद्दबातल करण्यास पात्र असेल" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

९. मूळ नियमांच्या नियम २५ ऐवजी, खालील नियम दाखल करण्यात येईल, म्हणजेच:-

"२५. सुधारणा नोटीस आणि अपराधांचे प्रशमन (तडजोड). -

(क) सुधारणा नोटीसची कार्यपद्धती आणि नमुना नियंत्रकाद्वारे वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

(ख) अधिनियमांतर्गत केलेल्या अपराधांच्या प्रशमनासाठी प्रति व्यक्ती शुल्क अनुसूची १४ मध्ये विहित केल्यानुसार असेल.

(ग) जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) अधिनियम, २०२६(२०२६ चा ०८) च्या प्रारंभाच्या तारखेपासून, म्हणजेच १ मे २०२६ पासून, प्रत्येक तीन वर्षांनी अनुसूची १४ मध्ये विहित केलेले प्रशमन शुल्क निश्चित केलेल्या किमान रकमेच्या दहा टक्क्यांनी वाढवले जाईल.".

१०. मूळ नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची ३ ऐवजी, खालील अनुसूची दाखल करण्यात येईल, म्हणजेच:-

"अनुसूची तीन"

नमुना आरएम

महाराष्ट्र शासन

वैध मापनशास्त्र यंत्रणा

(वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम ६(३)

वजन वा माप उत्पादक नोंदणी प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक: ..... वर्ष: .....

१. नियंत्रक, वैध मापनशास्त्र याद्वारे .....

(एक किंवा अनेक पक्षकारांची नावे व पत्ते) यांना पुढील उत्पादनासाठी नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करीत आहेत:

.....

(पक्षकाराने उत्पादन करावयाच्या वजन वा मापांचा तपशील समाविष्ट करावा).

२. हे नोंदणी प्रमाणपत्र उपनिर्दिष्ट पक्षकारासाठी त्यांच्या ..... येथे स्थित असलेल्या कार्यशाळेच्या जागेसंबंधांत वैध असेल.

३. उत्पादक नियम ७ मध्ये विहित शर्तीनुसार अटींचे अनुपालन करील. त्यापैकी कोणत्याही अटींचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केल्यास त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाण्यास पात्र असेल.

४. नोंदणीकृत उत्पादकाकडून वापरण्यात येणारे आद्याक्षर मुद्रा, बोधचिन्ह, ... याप्रमाणे आहेत:

(स्वाक्षरी)

नियंत्रक, वैध मापनशास्त्र

/ प्राधिकृत वैध मापनशास्त्र अधिकारी.

दिनांक: .....

ठिकाण: .....

टीप. – (क) संस्थेच्या बाबतीत, त्या संस्थेच्या व्यवसायात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींच्या नावांसह आस्थापनेचे नाव परिच्छेद १ मध्ये देण्यात यावे.

(ख) अपलोड केलेल्या स्व-साक्षांकीत कागदपत्रांनुसार नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.

नोंदणी प्रमाणपत्राच्या अटी: नियम ७ मध्ये विहित केल्यानुसार.

अनुसूची तीन
नमुना आरआर
महाराष्ट्र शासन
वैध मापनशास्त्र संस्था

(वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम ६(३))

वजन वा माप दुरुस्तक नोंदणी प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक: ..... वर्ष: .....

१. नियंत्रक, वैध मापनशास्त्र याद्वारे .....
(एक किंवा अनेक पक्षकारांची नावे व पत्ते) यांना पुढील वजन वा माप यांची दुरुस्ती करण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करत आहेत: .....

(पक्षकाराने दुरुस्ती करावयाच्या वजन वा मापांचा तपशील समाविष्ट करावा).

२. हे नोंदणी प्रमाणपत्र उपनिर्दिष्ट पक्षकारासाठी, त्यांच्या ..... या ठिकाणी स्थित असलेल्या कार्यशाळेच्या जागेसंबंधांत वैध असेल.

३. दुरुस्तक नियम ८ मध्ये विहित शर्तीनुसार अटींचे अनुपालन करील. त्यापैकी कोणत्याही अटींचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केल्यास त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाण्यास पात्र असेल.

४. नोंदणीकृत दुरुस्तकाच्या नोंदणी प्रमाणपत्रात नमूद केलेल्या वजन वा माप दुरुस्तीचे कार्यक्षेत्र खाली नमूद केल्याप्रमाणे असेल:- .....

(स्वाक्षरी)
नियंत्रक, वैध मापनशास्त्र
/प्राधिकृत वैध मापनशास्त्र अधिकारी.

दिनांक: .....
ठिकाण: .....

टीप. – (क) संस्थेच्या बाबतीत, त्या संस्थेच्या व्यवसायात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींच्या नावांसह आस्थापनेचे नाव परिच्छेद १ मध्ये देण्यात यावे.

(ख) अपलोड केलेल्या स्व-साक्षांकीत कागदपत्रांनुसार नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.

नोंदणी प्रमाणपत्राच्या अटी: नियम ८ मध्ये विहित केल्यानुसार.

अनुसूची तीन

नमुना आरडी

महाराष्ट्र शासन

वैध मापनशास्त्र यंत्रणा

(वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम ६(३))

वजन वा माप विक्रेता नोंदणी प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक: ..... वर्ष: .....

१. नियंत्रक, वैध मापनशास्त्र याद्वारे ..... (एक किंवा अनेक पक्षकारांची नावे व पत्ते) यांना पुढील वजन वा मापे यांची विक्री करण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करत आहेत:

पडताळणी व मुद्रांकन केलेले प्रमाणित वजन वा माप.

(पक्षकाराला ज्यांच्या विक्रीकरिता नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशी वजने, मापे, तोलण उपकरणे किंवा मापन उपकरणे यांच्या प्रकाराबाबतचा तपशील नमूद करावा).

२. हे नोंदणी प्रमाणपत्र उपनिर्दिष्ट पक्षकारासाठी, त्यांच्या ..... या ठिकाणी स्थित असलेल्या जागेसंबंधांत वैध असेल..

३. विक्री करणारी व्यक्ती, नियम ९ मध्ये मध्ये विहित शर्तीनुसार अटींचे अनुपालन करील. त्यापैकी कोणत्याही अटींचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केल्यास त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाण्यास पात्र असेल.

(स्वाक्षरी)

नियंत्रक, वैध मापनशास्त्र

/ प्राधिकृत वैध मापनशास्त्र अधिकारी.

दिनांक: .....

ठिकाण: .....

टीप. – (क) संस्थेच्या बाबतीत, त्या संस्थेच्या व्यवसायात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींच्या नावांसह आस्थापनेचे नाव परिच्छेद १ मध्ये देण्यात यावे.

*(ख) अपलोड केलेल्या स्व-साक्षांकीत कागदपत्रांनुसार नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.***नोंदणी प्रमाणपत्राच्या अटी: नियम ९ मध्ये विहित केल्यानुसार."**

११. मूळ नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची ४ ऐवजी, खालील नोंदी समाविष्ट करण्यात येत आहेत:-

"अनुसूची चार

(नियम ६(५) पहा)

वजन वा माप यांचे उत्पादक, दुरुस्तक आणि विक्रेते यांना नोंदणी प्रमाणपत्र देणे याकरिता द्यावे लागणारे शुल्क.-

नोंदणी प्रमाणपत्र देणे:

(१) उत्पादक: रु. ८०००/-

(२) दुरुस्तक: रु. ३०००/-

(३) विक्रेता: रु. १५००/-".

१२. मूळ नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची ५ ऐवजी, खालील नोंदी समाविष्ट करण्यात येत आहेत:-

"अनुसूची पाच

(नियम ६(६) पहा)

वजन वा माप यांचे उत्पादक, दुरुस्तक आणि विक्रेते यांच्या नोंदणी प्रमाणपत्रात फेरफार याकरिता द्यावे लागणारे शुल्क.- रु. ५००/- प्रति नोंदणी प्रमाणपत्र.".

१३. मूळ नियमांमधील अनुसूची ७ वगळण्यात येत आहे.

१४. मूळ नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची १४ ऐवजी, खालील नोंदी समाविष्ट करण्यात येत आहेत:-

"अनुसूची चौदा

(नियम २५(ख) पहा)

विविध अपराधांसाठी प्रशमन शुल्क (तडजोड शुल्क)

अनु. क्र.	गुन्ह्याचे स्वरूप	कलम	दंडात्मक कलम	आस्थापनेचा प्रकार	१ ल्या अपराधासाठी सुधारणा नोटीस/ तडजोड शुल्क (रु.)	२ ऱ्या अपराधासाठी तडजोड शुल्क (रु.)	त्यानंतरच्या अपराधासाठी तडजोड शुल्क (रु.)
(१)	*(२)*	*(३)*	*(४)*	*(५)*	*(६)*	*(७)*	*(८)*
१	अप्रमाणित वजन वा मापाचा वापर	८(३)	२५	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	२ ०० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२ ०००/-	२ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-

				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक/ आयातदार/विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	५ ०००/-	२ ०० ०००/-
				शासकीय/निमशासकीय/सह कारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	५ ०००/-	२ ०० ०००/-
				सार्वजनिक वाहन-काटा	सुधारणा नोटीस	५ ०००/-	२ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
२	वजन किंवा मापांमध्ये फेरफार/छेडछाड	२६	२६	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	२ ०००/-	१० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				किरकोळ विक्रेता	५ ०००/-	२५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				व्यापारी/घाऊक व्यापारी /वितरक	१० ०००/-	५० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक/ आयातदार/विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	२५ ०००/-	७५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				शासकीय/निमशासकीय/सह कारी संस्था/ट्रस्ट/बँक	५ ०००/-	२५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	२५ ०००/-	७५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				सार्वजनिक वाहन-काटा	२५ ०००/-	७५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	२५ ०००/-	७५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
३	अप्रमाणित वजन वा मापाचे उत्पादन	८(४)	२७	सर्व आस्थापना	सुधारणा नोटीस	५० ०००/-	२ ५० ०००/-
४	अप्रमाणित वजन वा मापाची विक्री	८(४)	२७	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५ ०००/-	२ ०० ०००/-

				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	१५ ०००/-	२ ०० ०००/-
				ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	५० ०००/-	२ ०० ०००/-
				शासकीय/निमशासकीय/सह कारी संस्था/ट्रस्ट	सुधारणा नोटीस	५० ०००/-	२ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	२ ०० ०००/-
५	विहित मानकाव्यतिरिक्त अन्यथा केलेला व्यवहार किंवा करार	१०	२८	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	१ ०० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	५ ०००/-	१ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	१० ०००/-	१ ०० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक/ आयातदार/विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ५० ०००/-
				शासकीय/निमशासकीय/सह कारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
६	अप्रमाणित परिमाणात जाहीर करणे अथवा उल्लेख करणे इत्यादी	११	२९	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	१ ०० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	५ ०००/-	१ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	१० ०००/-	१ ०० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक/ आयातदार/विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ५० ०००/-

				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	१ ०० ०००/-
७	मानक वजन, माप वा संख्येव्यतिरिक्त अन्य प्रकारची चाल ,रीत , पद्धत व वापर .	१२,३०	३०	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	५००/-	१ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				किरकोळ विक्रेता	५ ०००/-	१० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	५ ०००/-	१० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/आवेष्टक/ आयातदार/विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	७ ५००/-	१५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	५ ०००/-	१० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	७ ५००/-	१५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				सार्वजनिक वाहन-काटा	७ ५००/-	१५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा
८	अभिलेखाचे जतन न करणे वा उपलब्ध करुन न देणे .	१५(२),१७	३१	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	५० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	५ ०००/-	५० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	१० ०००/-	५० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता / ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	१५ ०००/-	७५ ०००/-
				शासकीय/निमशासकीय /सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	१० ०००/-	५० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	५० ०००/-

				सार्वजनिक वाहन-काटा	सुधारणा नोटीस	१० ०००/-	५० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	१५ ०००/-	७५ ०००/-
९	पडताळणी न केलेल्या वजन वा मापांचा उपयोग ,विक्री ,वितरण किंवा वाटप करणे.	२४(१),३३	३३	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	२ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				किरकोळ विक्रेता	३ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				घाऊक व्यापारी / वितरक	३ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक /आवेष्टक/ आयातदार /विक्रेता /ई-कॉमर्स संस्था	५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				शासकीय/निमशासकीय/सह कारी संस्था/ट्रस्ट/बँक	२ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				सार्वजनिक वाहन-काटा	५ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	२ ०००/-	तडजोड न करण्याजोगा	तडजोड न करण्याजोगा
१०	अप्रमाणित वजन वा मापाने वस्तू/मालाची विक्री किंवा वितरण करणे इत्यादी	३४	३४	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	१ ०००/-	५० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२ ०००/-	५० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	५ ०००/-	५० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	१० ०००/-	७५ ०००/-
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	५ ०००/-	५० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	७५ ०००/-
११	अप्रमाणित वजन वा मापाद्वारे सेवा पुरविणे	३५	३५	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	५० ०००/-

				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२ ०००/-	५० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	५ ०००/-	५० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	१० ०००/-	७५ ०००/-
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	५ ०००/-	५० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	७५ ०००/-
१२	आवेष्टित वस्तूंवरील उद्घोषणांची पूर्तता करणेबाबत	१८(१)	३६(१)	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	१०००/-	२५ ०० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२५ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	२५ ०००/-	२५ ०० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	१ ०० ०००/-	३० ०० ०००/-
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२५ ०० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२५ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२५ ०० ०००/-
१३	आवेष्टित वस्तूचे निव्वळ वजन/माप/ संख्या याबाबतची पूर्तता	१८(१)	३६(२)	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	१० ०००/-	२० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				किरकोळ विक्रेता	१५ ०००/-	५० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	२० ०००/-	५० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता /ई-कॉमर्स संस्था	५० ०००/-	१ ०० ०००/-	तडजोड न करण्याजोगा

				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	१० ०००/-	५० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	२५ ०००/-	५० ०००/-	तडजोड न करण्याजोगा
१४	शासकीय मान्यताप्राप्त चाचणी केंद्राकडून नियमांचे उल्लंघन	३७(१)	३७(१)	शासकीय मान्यताप्राप्त चाचणी केंद्र	७५ ०००/-	लागू नाही	लागू नाही
१५	खोटी माहिती/ विवरणपत्रे/ नोंदवही अभिलेख देणे	४१	४१(१)	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	सुधारणा नोटीस	५००/-	२ ०० ०००/-
				किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	२ ०००/-	२ ०० ०००/-
				व्यापारी/घाऊक व्यापारी/वितरक	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	सुधारणा नोटीस	४ ०००/-	२ ०० ०००/-
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	सुधारणा नोटीस	२ ०००/-	२ ०० ०००/-
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
				सार्वजनिक वाहन-काटा	सुधारणा नोटीस	२ ०००/-	२ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
१६	खोटी माहिती/ विवरणपत्रे / नोंदवही /अभिलेख सादर करणे.	४१	४१(२)	वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते/ आयातदार	सुधारणा नोटीस	२ ०००/-	२ ०० ०००/-
१७	नोंदणी प्रमाणपत्राशिवाय वजन वा मापाचे उत्पादन करणे.	२३	४५	सर्व आस्थापना	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२ ०० ०००/-
१८	नोंदणी प्रमाणपत्राशिवाय वजन वा मापाची दुरुस्ती इत्यादी करणे.	२३	४६	सर्व आस्थापना	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-

१९	नोंदणी प्रमाणपत्राशिवाय वजन वा मापांची विक्री इत्यादी करणे.	२३	४६	सर्व आस्थापना	सुधारणा नोटीस	३ ०००/-	२ ०० ०००/-
२०	नोंदणी प्रमाणपत्रामध्ये अनधिकृत बदल करणे.	४७	४७	आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/पॅकर/आयातदार	सुधारणा नोटीस	१० ०००/-	२ ०० ०००/-
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	सुधारणा नोटीस	१५ ०००/-	३ ०० ०००/-
२१	या अधिनियमांतर्गत बनविलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन.	५३(३)	५३(३)	फेरीवाले / रस्त्यावरील विक्रेते	५००/-	लागू नाही	लागू नाही
				किरकोळ विक्रेता	१ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				व्यापारी/घाऊक व्यापारी /वितरक	१ ५००/-	लागू नाही	लागू नाही
				आवेष्टित वस्तूंचे उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ विक्रेता/ई-कॉमर्स संस्था	५ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				शासकीय/निमशासकीय/ सहकारी संस्था/ट्रस्ट/बँक	२ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				पेट्रोल पंप/सि.एन.जी./एल. पी. जी./किरकोळ विक्रेता	५ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				सार्वजनिक वाहन-काटा	५ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				शासकीय मान्यताप्राप्त चाचणी केंद्र	७५ ०००/-	लागू नाही	लागू नाही
				वजन वा मापांचे उत्पादक /दुरुस्तक/विक्रेते	२ ०००/-	लागू नाही	लागू नाही
२२	वैध मापनशास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११ च्या कोणत्याही तरतुदीचा भंग, ज्यासाठी वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ मध्ये कोणतीही वेगळी तरतूद नाही.		३२	सर्व आस्थापना	५ ०००/-	--	--

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. संजीव कुमार)
शासनाचे सचिव.

FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 30th October, 2026.

NOTIFICATION

LEGAL METROLOGY ACT, 2009.

No. LML-2026/CR-39/CP-3.— The following draft of rules further to amend the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 53 of the Legal Metrology Act, 2009 (1 of 2010), and of all other powers enabling it in that behalf and after consultation with the Central Government as required by sub-section (*1*) of section 53 of the said Act, is hereby published as required by sub-section (*4*) of said section 53, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft rules will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 19.11.2026.

2. Any objection or suggestion which may be received within fifteen days from the date of publication of the notification in the *Official Gazette* by the Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Annex Building, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-400 032, from any person or organization with respect to the said draft rules, before the expiry of the aforesaid period, will be considered by the Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Legal Metrology (Enforcement) (First Amendment) Rules, 2026.

2. In rule 6 of the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011 (hereinafter referred to as "the principal Rules"),-

(a) in sub-rule *(1),*-

(*i*) for the word "licence" the words "registration certificate" shall be substituted;

(*ii*) after the word "form" the words "with self-declaration" shall be inserted;

(*iii*) in the first proviso for the word "license" the words "registration certificate" shall be substituted;

(*iv*) in the second proviso for the word "license" the words "registration certificate" shall be substituted;

